# INDEX(2018-2019)

## 3.6.2 Number of extension and outreach programs conducted by the institution through organized forums including NSS/NCC with involvement of community year wise during the last five years

| Sr.No. | Name of the activity | Organising unit/ Forum/ collaborating agency |
|---|---|---|
| 1 | Gram Swachhata Abhiyan | NSS unit of Degree College of Physical Education, Shree H. V. P. Mandal, Amravati. |
| 2 | District Hospital Swachhata Abhiyan | NSS unit of Degree College of Physical Education, Shree H. V. P. Mandal, Amravati. |
| 3 | Blood Donation Camp | NSS and NCC unit of Degree College of Physical Education, Shree H. V. P. Mandal, Amravati and Punjabrao Deshmukh Medical College(PDMC) |
| 4 | Dengue Awareness Rally | NSS unit of Degree College of Physical Education, Shree H. V. P. Mandal, Muncipal Corporation Amravati and Vidarbha Ayurvedic Mahavidyalaya |
| 5 | Tree Plantation | NSS and NCC unit of Degree College of Physical Education, Shree H. V. P. Mandal, Amravati. |
| 6 | Blood Checking Camp | Baheti Hospital, Amravati and NSS unit of Degree College of Physical Education, Shree H. V. P. Mandal, Amravati. |
| 7 | Blood Donation Camp in memory of Martyrs | NSS and NCC unit of Degree College of Physical Educations NSS Group and Hindi Mahasangh |
| 8 | Participation in State Level Disaster managment Camp | NSS unit of Degree College of Physical Education, Dr. Babasaheb Ambedkar Marathawada University, Aurangabad. |
| 9 | Satya Mev Jaytae Water Cup Competition | NSS unit of Degree College of Physical Education, Shree H. V. P. Mandal, Amravati and Pani Foundation and Revenue Department of Pimpalgaon Banai. |
| 10 | Participation Disaster Management Camp | NSS unit of Degree College of Physical Education and Sant Gadge Baba Amravati University, Amravati. |

**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारा संलग्नित व**
**श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळद्वारा संचालित**
**डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन (स्वायत्त महाविद्यालय)**
**राष्ट्रीय सेवा योजना पथक वार्षिक कार्य वृत्तांत (सत्र २०१८-१९)**

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन राष्ट्रीय सेवा योजना पथकांतर्गत २०० विद्यार्थ्यांचा समावेश असून श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या पारंपारिक परंपरेनुसार विद्यार्थ्यांना विविध सामाजिक क्रीडा व शैक्षणिक कार्यामध्ये सहभागी करुन घेण्याची महाविद्यालयाची गौरवशाली परंपरा जोपासण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे केल्या जात आहे.

**सत्र २०१८-१९ मध्ये राष्ट्रीय सेवा योजना पथकातील विद्यार्थ्यांनी खालील उपक्रमांमध्ये सहभाग घेतला**

**१) आपत्ती व्यवस्थापन जिल्हानिहाय प्रशिक्षण व निवड चाचणी शिबीरात सहभाग :-** दि. २५ ते २६ एप्रिल-२०१८ दरम्यान विद्यार्थी भवन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे द्विदिवसीय प्रशिक्षण निवड चाचणी करीता महाविद्यालयातील दोन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक स्वप्नील रितपुरकर व गौरव भुजाडे यांना आपत्ती व्यवस्थापन शिबीरात सहभागी होण्याकरीता पाठविण्यात आले असता दोघांची निवड औरंगाबाद येथे होणा-या राज्यस्तरीय शिबीराकरीता करण्यात आली.

**२) सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धा पाणी फाऊन्डेशन द्वारा आयोजित जलयुक्त गाव उपक्रमामध्ये श्रमदान :-** दि. १९ मे २०१८ रोजी श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्यूकेशन द्वारे सत्यमेव जयते वॉटरकप स्पर्धा पाणी फाऊन्डेशन द्वारा राज्यातील सर्वच जिल्हा व तालुका पातळीवरील दुष्काळ परिस्थीतीवर मात करण्यासाठी नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील पिंपळगाव बैनाई या गावाचा समावेश झाला असता त्या ठिकाणी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देबनाथ तसेच मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, मंडळाच्या सचिव डॉ. माधुरी चेंडके यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज तायडे, प्रा. आशिष हटेकर, प्रा. संतोष इंगोले यांच्या नेतृत्वात ८० राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन पिंपळगाव बैनाई येथे गावच्या सरपंच सौ. शरयू पंडीत, श्रमदान समितीचे अध्यक्ष श्री. अजय पंडित यांच्या माध्यमातून एक कि.मी. चा बांध तयार करुन तब्बल एक कोटी लिटर पाण्याची बचत केल्या जाईल एवढा मोठा उपक्रम राबविण्यात आला असता महाश्रमदान केले. या मध्ये मंडळाच्या सि.डी. एफ विभागाचे प्रमुख श्री. प्रशांत चौधरी, श्री. विजय इंगोले, श्री. धर्मेंद्र दवे, श्री. संजय खडसे, जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी श्री. नारायण सानप, खंडविकास अधिकारी, श्री. नंदकुमार धरणे, तहसिलदार मनोज लोणारकर, पाणी फाऊन्डेशनचे श्री. अतुल पाटील, सौ. सिमा ताकस यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले.

**३) आव्हान चान्सलर्स ब्रिगेड-२०१८ आपत्ती व्यवस्थापन राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबीरात सहभाग :-** दि. २५ मे ते ३ जुन २०१८ दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे आयोजीत करण्यात आलेल्या आव्हान-२०१८ आपत्ती व्यवस्थापन राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबीरामध्ये महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक स्वप्नील रितपुरकर, गौरव भुजाडे यांनी सहभागी होऊन शिबिरामध्ये आग नियंत्रण पुरस्थिती नियंत्रण व व्यवस्थापन, संकटकाळात करावयाची उपाययोजना, अपघात कालावधीत घ्यावयाची दक्षता व प्रथमोपचार आदीचे प्रशिक्षण प्राप्त करुन यशस्वी सहभाग घेतला.

**४) सत्र आरंभ उद्घाटन कार्यक्रम :-** दि. १० ऑगस्ट २०१८ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथक सत्र आरंभ उद्घाटन कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देबनाथ, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज तायडे, प्रा. आशिष हटेकर, प्रा. संतोष इंगोले, सौ. शालीनी देवळे, प्रा. डॉ. किरण गायकवाड व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक यांचा समावेश होता. कार्यक्रमा दरम्यान प्रा. मनोज तायडे यांनी राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे राबविण्यात येणा-या विविध उपक्रमाविषयी माहिती दिली. तसेच प्राचार्य डॉ. के. के. देबनाथ यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमासोबत सामाजिक बांधिलकी ठेवून, राष्ट्रीय सेवा योजना द्वारे राबविण्यात येणा-या उपक्रमामध्ये, सामाजिक, नैसर्गिक आपत्ती, खेळ व क्रिडा क्षेत्रामध्ये योगदानात्मक कार्य करुन आपला नावलौकीक वाढवावा असे संबोधुन पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

**५) शहिदांच्या स्मृतीप्रित्यर्थ रक्तदान :-**



दि. १४ ऑगस्ट २०१८ रोजी डि.सी.पी.इ. च्या रा.से.यो पथकाद्वारे व हिंदी महासंघाच्या वतीने शहीदांच्या स्मृतीप्रित्यर्थ रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असता कार्यक्रमाकरीता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देबनाथ, वरिष्ठ प्रा. डॉ. टॉमी जोश, प्रा. डॉ. संजय तिरथकर व एन.सी.सी. विभागाचे प्रमुख प्रा. लेफ्टनंट देवानंद सावरकर, हिंदी महासंघाचे श्री. राजेंद्र पारेख, श्री. घनश्याम वर्मा, मंडळाच्या सचिव डॉ. माधुरीताई चेंडके, रा.से.यो कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज तायडे, प्रा. आशिष हटेकर यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थी तथा श्री. ह.व्या.प्र. मंडळाचे पोलीस प्रशिक्षणार्थी व कर्मचारी यांनी सहभागी होऊन जवळपास २५ जणांनी रक्तदान केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता प्रा. राजेश पांडे, प्रा. सुनिल पिपळे, श्री. प्रशांत चौधरी यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले.

**६) पुर्व गणतंत्रदिन पथसंचालन निवड चाचणी करिता सहभाग :-** दि. २९ ते ३० ऑगस्ट २०१८ या कालावधीत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे आयोजित पुर्वगणतंत्र दिन पथसंचालन निवड चाचणी करीता महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक गौरव भुजाडे व कु. तेजस्वीनी खंडारे यांनी सहभागी होऊन उत्कृष्ठ सहभाग घेतला व त्यापैकी गौरव भुजाडे यांची निवड संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या पुर्व गणतंत्र दिन पथसंचालनामध्ये सहभागी होण्यासाठी करण्यात आली.

**७) रक्तगट तपासणी शिबीर :-**



दि. ३ सप्टेंबर २०१८ रोजी महाविद्यालयामध्ये प्रथमत: प्रवेशित झालेल्या बी.पी.ई.एस व बी.पी.एड प्रथम वर्ष विद्यार्थी व रा.से.यो पथकामध्ये सहभागी झालेल्या स्वयंसेवकाना रक्तगटाबद्दल माहिती व्हावी व रक्तदान सेवा कार्यामध्ये सहभाग घेता यावा या उद्देशाने गणेशदास राठी महाविद्यालय, अमरावती येथील डॉ. घनश्याम बाहेती व त्यांच्या चमूच्या नेतृत्वात रक्तगट तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थी व रा.से.यो. पथकामध्ये सहभागी स्वयंसेवक यांनी सहभागी होऊन जवळपास २४५ जणांनी रक्तगट तपासणी करुन घेतली व रक्तगटाबद्दल माहिती जाणून घेतली.

**८) वृक्षारोपण कार्यक्रम :-**



दि. ५ सप्टेंबर २०१८ रोजी डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन राष्ट्रीय सेवा योजना पथक व योग विभागाद्वारे महाविद्यालयाच्या परिसरात शिक्षकदिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.के. देबनाथ, प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. वंदना काळे, शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती, डी.सी.पी.ई. चे माजी प्राचार्य डॉ. विकास कोळेश्वर, रा.से.यो चे कोषाध्यक्ष डॉ. सुरेशराव देशपांडे, प्रा. जयंत गोडसे, डॉ. सुर्यकांत पाटील या मान्यवरांच्या उपस्थितीत घेण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयीन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले व नंतर रा.से.यो. स्वयंसेवक व महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्या माध्यमातून महाविद्यालयीन परिसरामध्ये ५० रोपट्यांचे वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी योगा विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. सुनिल लाबडे, डॉ. प्रविण अनासाने, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज तायडे, प्रा. आशिष हटेकर व प्रा. संतोष इंगोले यांचे सहकार्य लाभले.

NCC

**९) डेंग्यू रोगाला प्रतिबंध करण्या करीता डेंग्यू रॅली जनजागृती अभियान :-** दि. ६ सप्टेंबर २०१८ रोजी डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन व अमरावती महानगर पालिका कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना पथकाव्दारे डेंग्यूच्या रोगापासून बचावाकरीता डेंग्यू रोगाला आळा घालण्यासाठी जनजागृती अभियान रॅली चे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी अमरावती महानगर पालिकेचे नगरसेवक श्री. अजय सारसकर, श्री. प्रणीत सोनी आणि नगरसेविका सौ. लविना हर्षे, सौ. कुळकर्णी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देबनाथ, प्रा. डॉ. संजय तिरथकर, प्रा. अजय चंडके, प्रा. दिपा कान्हेगावकर, प्रा. डॉ. महेन्द्र लोणकर, डॉ. श्रीकांत पाटील, एन.एस.एस कार्यक्रम अधिकारी प्रा. आशिष हटेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत रॅली काढण्यात आली. रॅलीची सुरुवात डि.सी.पी.ई. च्या इमारती समोरील प्रांगणातून माधवनगर, देशपांडे वाडी, प्रभात कॉलनी, कोल्हटकर कॉलनी, गणेश कॉलनी, रविनगर चौक, भुतेश्वर चौक, गोरक्षण चौक व परत महाविद्यालय परिसरामध्ये समारोप घेण्यात आला. रॅलीदरम्यान प्रत्येक परिसरातील घरांमध्ये डेंग्यू रोगापासून सुरक्षा संबंधी माहिती पत्रक वाटण्यात आले. यामध्ये महाविद्यालय रा.से.यो. स्वयंसेवक तसेच महाविद्यालयातील बी. पी.ए., बी.सी.ए., बी.एस.सी. तसेच आयुर्वेदीक महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.



**१०) स्व. अंबादासपंत वैद्य स्मृती रक्तदान शिबीरामध्ये सहभाग :-** दि. ७ सप्टेंबर २०१८ रोजी श्री. ह. व्या. प्र. मंडळाचे आद्य संस्थापक गुरुवर्य स्व. अंबादासपंत वैद्य स्मृती दिना निमित्य मंडळाच्या अनंत क्रिडा मंदिर आंतर सभागृहात पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असता कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देबनाथ, उद्घाटक म्हणून ॲड. प्रशांत देशपांडे, प्रमुख अतिथी डॉ. गोविंदभाऊ कासट, प्रा. अशोक गोखले, डॉ. सुरेशराव सावदेकर, मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. हिम्मतराव घाम, जिल्हा सामान्य रुग्णालयाचे शल्य चिकित्सक डॉ.

NCC



श्यामसुंदर निकम, डॉ. जाधव, रक्तदान समितीचे उपाध्यक्ष श्री. अजय दातेराव, मंडळाच्या सचिव डॉ. माधुरीताई चेंडके यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद विद्यार्थी विद्यार्थी तथा रा.से.यो. स्वयंसेवकांनी उत्स्फुर्तपणे सहभागी होऊन १७५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. जयंत इंगोले यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. विजय पांडे यांनी केले. कार्यक्रमाकरीता रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज तायडे व प्रा. आशिष हटेकर यांनी महत्वपूर्ण योगदान दिले.

**११) राज्यस्तरीय / राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचालनपूर्व राज्यस्तरीय रा.से.यो. स्वयंसेवक निवड चाचणी शिबीर पुणे येथे सहभाग :-** दि. ८ ते १० सप्टेंबर २०१८ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ येथे आयोजीत राज्यस्तरीय / राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलनपूर्व राज्यस्तरीय रा.से.यो. स्वयंसेवक निवड चाचणी शिबीरामध्ये महाविद्यालयीन रा.से.यो. स्वयंसेवक गौरव अरुणराव भुजाडे यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ द्वारे सहभागी होऊन उत्कृष्ट कामगीरी केली. त्याकरीता त्याला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देबनाथ , एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज तायडे, प्रा. आशिष हटेकर यांचे नेतृत्व लाभले.

**१२) जिल्हा सामान्य रुग्णालय व न्यु आझाद गणेशोत्सव मंडळ परिसरात <u>स्वच्छता अभियान</u> :-** दि. २४ सप्टेंबर २०१८ रोजी सकाळी ८ ते ११ दरम्यान डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे १५० स्वयंसेवकांनी जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती व न्यू आझाद गणेशोत्सव मंडळ, इर्विन चौक परिसरात साफ-सफाई करुन स्वच्छता अभियान राबवले. यामध्ये जिल्हा सामान्य रुग्णालयाचे शल्य चिकित्सक डॉ. श्याम सुंदर निकम व न्यू आझाद गणेशोत्सव मंडळ, इर्विन चौक येथील अध्यक्ष श्री. दिनेशभाऊ बुब व श्री. गणेश शर्मा, महाविद्यालयाचे प्रा. डॉ. संजय तिरथकर, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज तायडे, प्रा. आशिष हटेकर व प्रा. प्रतिक कोंडे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. त्याकरीता जिल्हा सामान्य रुग्णालयाचे कर्मचारी श्री. गजानन खंडारे व मंडळाचे कार्यकर्ते यांचे मोलाचे सहकार्य लाभले. स्वच्छता अभियानाकरीता मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देबनाथ, प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांचे मार्गदर्शन लाभले.





**१३) महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्य सिध्दी विनायक मंदीर, वायगाव येथे <u>ग्रामस्वच्छता अभियान</u> :-** दि. १ ऑक्टोंबर २०१८ रोजी महात्मा गांधी च्या १५० व्या जयंती निमित्य सिध्दीविनायक मंदीर, वायगाव, ता. भातकुली, जि. अमरावती येथे महाविद्यालयीन ५० रा.से.यो. स्वयंसेवकांनी ग्रामस्वच्छता अभियान राबविले. त्यामध्ये सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत गावातील विविध परिसर त्यामध्ये विश्वेश्वर मंदीर, बौध्द विहार, सिध्दीविनायक मंदीर परिसरात साफसफाई करुन गावातील नागरीकांना स्वच्छता अभियानामध्ये सहभागी करुन घेतले व स्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगितले. यामध्ये गावचे सरपंच श्री. रोशन आगरकर,



ग्रामसेवक भरत निस्ताने व गावकऱ्यांचे सहकार्य लाभले. स्वच्छता अभियानाकरीता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देवनाथ यांनी मार्गदर्शन केले व संपुर्ण अभियान रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज तायडे, प्रा. आशिष हटेकर, वरिष्ठ प्रा. संतोष इंगोले, प्रा. शालिनी देवळे व महाविद्यालयाचे प्रा. प्रतिक कोंडे, प्रा. ओमप्रकाश झोड यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्वच्छता अभियान यशस्वीरित्या राबविण्यात आले.

**१४) व्यसनमुक्ती रॅली :-** दि. ३ ऑक्टोंबर २०१८ रोजी महाविद्यालयाच्या रा.से.यो. पथकाद्वारे तसेच महाविद्यालयातील



विभिन्न अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना सहभागी करुन व्यसन मुक्ती रॅली काढण्यात आली. यामध्ये महाविद्यालयीन ३५० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. रॅलीची सुरुवात महाविद्यालयीन परिसरातून गांधी चौक, राजकमल चौक, जयस्तंभ चौक, श्याम चौक, प्रभात चौक, जवाहर गेट, जुना मोटर स्टॅन्ड, गांधी चौक, ह.व्या.प्र. मंडळ परिसरात समाप्ती करण्यात आली. रॅलीचा मार्ग ३ कि.मी. होता. याकरीता रॅलीला हिरवी झेंडी दाखवण्याकरीता अमरावती महानगरपालीकेच्या उपमहापौर सौ. संध्याताई टिकले, मंडळाच्या सचिव डॉ. माधुरीताई चेंडके, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देवनाथ, डॉ. वि. एम. कोळेश्वर, डॉ. संजय तिरथकर, सर्व अभ्यासक्रम प्रमुख यामध्ये बी. पी. ए., बी.सी. ए., बी.एस.सी. या महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद यांची फार मोठ्या संख्येने उपस्थिती होती. रॅलीच्या माध्यमातून व्यसनमुक्ती अभियान यशस्वीरित्या पार पडले.

**१५) पश्चिम विभागीय राष्ट्रीय सेवा योजना पूर्व राष्ट्रीय प्रजासत्ताक निवड चाचणी शिबीरात सहभाग :-** दि. २५



नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०१८ या कालावधीत मल्टीपर्पज मंडला हास्टेल, एल.आय.टी. परिसर, भारत नगर, अमरावती रोड, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे आयोजित पश्चिम विभागीय राष्ट्रीय पूर्व पथसंचालन शिबीरामध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाद्वारे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याकरीता महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक गौरव भुजाडे याची निवड करण्यात आली असता शिबिरामध्ये उत्कृष्ट सहभाग घेऊन त्यातुन त्याची निवड महाराष्ट्र राज्य पूर्व गणतंत्र प्रजासत्ताक दिन पथसंचालनाकरीता करण्यात आली.

**१६) जागतिक एडस् दिनानिमित्य आयोजित जनजागृती रॅलीमध्ये सहभाग :-** दि.३ डिसेंबर २०१८ रोजी संत गाडगेबाबा



अमरावती विद्यापीठ, अमरावती व जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने जागतिक एडस् दिनाचे औचित्य साधून एडस् जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले असता यामध्ये महाविद्यालय ७५ स्वयंसेवकांनी एन. एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज तायडे, प्रा. आशिष हटेकर यांच्या मार्गदर्शनखाली सहभागी होऊन जनजागृती अभियानामध्ये योगदान दिले. या प्रसंगी अमरावती जिल्ह्यातील विविध महाविद्यालयाचे रा.से.यो. स्वयंसेवक व अन्य संस्थेचे विद्यार्थी, डॉक्टर यांचा सहभाग होता.

**१७) जिल्हास्तरीय रा.से.यो. शिबीरामध्ये सहभाग :-** दि. १७ ते २४ डिसेंबर २०१८ या कालावधीत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती च्या वतीने वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांचे जन्मस्थान श्री. क्षेत्र शेंडगाव, ता. अंजनगाव सुर्जी येथे स्वच्छ भारत व स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत अमरावती जिल्हास्तरीय शिबीरामध्ये महाविद्यालयीन दोन स्वयंसेवक सुमीत घरडे व विवेक मोरे यांनी यशस्वी सहभाग दर्शविला.



**१८) बेटी बचाओ बेटी पढाओ जनजागृती रॅलीमध्ये सहभाग :-** दि. २ जानेवारी २०१९ रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर येथून आयोजित 'बेटी बचाव बेटी पढाओ' या विषयाच्या संदर्भात 'नॅशनल वॉक थॉन' रॅली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असता महिला स्वास्थ्य, सशक्तीकरण व सन्मान, स्त्रीभ्रूण हत्या विरोध, H.I.V. जनजागृती तसेच पर्यावरण संरक्षण या विषयाच्या अनुषंगाने आयोजित रॅलीमध्ये महाविद्यालयीन १५० रा.से.यो. स्वयंसेवकांनी सहभाग घेऊन इर्विन चौक ते आय.एम.ए. हॉल, गर्ल्स हायस्कुल चौक मार्गे ते जिल्हा स्टेडीयम या ठिकाणी रॅलीचा समारोप करण्यात आला. या रॅलीमध्ये संपूर्ण रॅली शिस्तबध्द पध्दतीत होण्याकरीता स्वयंसेवकांनी सेवा देऊन त्यामध्ये रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज तायडे, प्रा. आशिष हटेकर व प्रा. ललित शर्मा व प्रा. डॉ. उदय मांजरे यांचे नेतृत्वात रा.से.यो. स्वयंसेवकांनी यशस्वीपणे कार्य केले.



**१९) स्वामी विवेकानंद जयंती उत्सव साजरा :-** दि. १२ जानेवारी २०१९ रोजी युगप्रवर्तक स्वामी विवेकानंद जयंती समारोह "राष्ट्रीय युवकदिन" श्री. ह. व्या. प्र. मंडळामध्ये डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन रा. से. यो. पथकातील स्वयंसेवकाद्वारे साजरा करण्यात आला. कार्यक्रमप्रसंगी मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांच्या हस्ते स्वामी विवेकानंदाच्या पुतळ्याला माल्यार्पण व पुष्पांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देबनाथ, उपप्राचार्य डॉ. एस. पी. देशपांडे, श्री. ह. व्या. प्र. मंडळाच्या सचिव डॉ. सौ. माधुरीताई चेंडके, प्रा. डॉ. अजय उपाध्याय, प्रा. डॉ. दिपक फडणीस, प्रा. डॉ. सुभाष चव्हाण, प्रा. डॉ. उदय मांजरे, प्रा. संतोष इंगोले, प्रा. डॉ. टॉमी जोस, प्रा. डॉ. बाबर अली खान व महाविद्यालयीन सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी, सर्व विभागाचे विद्यार्थी व विद्यार्थीनींनी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांनी स्वामी विवेकानंदाचा आदर्श आपण आपल्या जीवनात ठेवला पाहिजे असा संदेश देऊन स्वामीजींच्या जीवनपैलू विषयी विचार व्यक्त करुन मार्गदर्शन केले. याप्रसंगी रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज तायडे, प्रा. आशिष हटेकर व प्रा. कमलाकर शहाणे यांनी कार्यक्रमाचे व्यवस्थापन केले तसेच प्रा. आशिष हटेकर यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले व उपस्थित सर्व मान्यवर व विद्यार्थी यांनी स्वामी विवेकानंदाच्या पुतळ्याला श्रध्दासुमने व पुष्पांजली अर्पण करुन जयंती उत्सव साजरा केला.



**२०) राज्यस्तरीय प्रजासत्ताक पथसंचालनात सहभाग :-** दि. २७ जानेवारी ते २६ जानेवारी २०१९ या कालावधीत स्पोर्टस् कॉम्प्लेक्स विद्यानगरी, कालीना, सांताक्रुज पुर्व, मुंबई येथे रा.से.यो. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या वतीने राज्यस्तरीय प्रजासत्ताक पथ संचलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असता महाविद्यालयीन रा.से.यो. स्वयंसेवक गौरव भुजाडे याची निवड झाली असता त्यामध्ये त्याने उत्कृष्ट सहभाग दर्शविला. त्याकरीता त्याला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देवनाथ, एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज तायडे, प्रा. आशिष हटेकर यांचे नेतृत्व लाभले.



**२१) राज्यस्तरीय साहसी क्रिडा शिबीराचे आयोजन व सहभाग :-** दि. २९ जानेवारी २०१९ ते २ फेब्रुवारी २०१९ या कालावधीत चिखलदरा येथे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन अॅडव्हेंचर स्पोर्टस् द्वारा साहसी क्रिडा शिबीराचे आयोजन करण्यात आले असता त्यामध्ये महाविद्यालयीन रा.से.यो. स्वयंसेवक कु. प्रिया भारती, कु. विशाखा सुरोशे, मेधा कुमारी, बंधन कुमारी आणि हेमंत जोशी यांनी प्रशिक्षण शिबीरामध्ये सहभागी होऊन त्यामध्ये त्यांना प्रा. डॉ. उदय मांजरे, प्रा. डॉ. दिनानाथ नवाथे, प्रा. डॉ. विजय पांडे व अन्य सहकारी मार्गदर्शक यांच्या नेतृत्वात उत्कृष्ट मार्गदर्शन प्राप्त झाले.



**२२) मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन :-** दि. १८ फेब्रुवारी २०१९ रोजी महाविद्यालयीन रा.से.यो. पथकाद्वारे मतदान जनजागृती रॅली चे आयोजन करण्यात आले असता रॅलीची सुरुवात महाविद्यालयीन परिसरातून गांधी चौक, राजकमल चौक, जयस्तंभ चौक, श्याम चौक, प्रभात चौक, जवाहर गेट, जुना मोटर स्टॅन्ड, गांधी चौक, ह.व्या.प्र. मंडळ परिसरात समाप्ती करण्यात आली. त्यामध्ये महाविद्यालयीन बि.बि.ए., बि.एस.सी., बि.पी. एस विभागाचे ३२५ विद्यार्थी विद्यार्थीनींनी सहभागी होऊन मतदान करा असा संदेश देऊन रॅलीच्या माध्यमातून जनजागृती केली. याकरीता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देवनाथ तसेच महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज तायडे, प्रा. आशिष हटेकर, प्रा. संतोष इंगोले, प्रा. डॉ. किरण गायकवाड यांचे योगदान लाभले.



**२३) शहिद सन्मान यात्रा तिरंगा रॅलीमध्ये सहभाग :-** दि. २३ फेब्रुवारी २०१९ रोजी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, अमरावती यांचे मार्फत सकाळी ९ वाजता दसरा मैदान, बडनेरा रोड, अमरावती येथून आयोजित शहिद सन्मान यात्रा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असता यामध्ये महाविद्यालयीन ६० रा.से.यो. स्वयंसेवकांनी सहभागी होऊन शहिदांच्या सन्मानार्थ काढण्यात आलेल्या ५०० फुट तिरंगा ध्वज खांद्यावर सन्मानपुर्वक घेऊन तिरंगा रॅलीमध्ये प्रा. मनोज तायडे, प्रा. आशिष हटेकर व प्रा. अनीकेत आंबेकर यांच्या नेतृत्वात यशस्वीरीत्या सहभाग घेतला.

